**"माझी कन्या भाग्यश्री" योजना राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१५/प्र.क्र.५४ (भाग-२)/का.६**

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१६

<u>वाचा :</u>- महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.सुकन्या-२०११/प्र.क्र.१४४/का-३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४

**<u>प्रस्तावना</u>:-**

महाराष्ट्र राज्यामध्ये मुलींचे शिक्षण, आरोग्य यामध्ये सुधारणा करणे त्यांच्या उज्ज्वल भविष्याकरीता आर्थिक तरतूद करणे, बालिका भ्रुणहत्या रोखणे, मुलींच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे, बालविवाह रोखणे आणि मुलां इतका मुलींचा जन्मदर वाढविणे या उद्देशाने राज्यात शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ अन्वये "सुकन्या" योजना सुरु करण्यात आली आहे. सुकन्या योजनेचे लाभ दिनांक ०१ जानेवारी, २०१४ पासून जन्मणाऱ्या मुलींकरिता अनुज्ञेय आहेत.

तसेच केंद्र शासनाने "बेटी बचाओ-बेटी पढाओ" ही योजना फेब्रुवारी, २०१४ पासून सुरु केलेली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार सदर योजनेसाठी भारतातील १०० जिल्हयांची निवड करण्यात आलेली आहे. ज्या जिल्हयामध्ये मुलींचे जन्माचे प्रमाण कमी आहे त्या जिल्हयामध्ये सदर योजना लागू करण्यात आली आहे. या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये महाराष्ट्रातील बीड, जळगांव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली व जालना या १० जिल्हयांची निवड करण्यात आली आहे. राज्यात मुलींचा जन्मदर १००० मुलांच्या मागे ८९४ इतका आहे. मुलींच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे आणि मुलां इतका मुलींचा जन्मदर वाढविणे या उद्देशाने "बेटी बचाओ-बेटी पढाओ" या योजनेच्या धर्तीवरच मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांना शिक्षण देणे व बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी सध्या सुरु असलेली सुकन्या योजना विलीन करुन व त्याबाबतचा उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णय अधिक्रमित करुन "माझी कन्या भाग्यश्री" ही नवीन योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, त्यांना शिक्षण देणे व बालविवाहास प्रतिबंध करणे या उद्देशासाठी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये "सुकन्या योजना" दिनांक ०१ जानेवारी, २०१४ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील दारिद्रय रेषेखाली जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीच्या नांवे रुपये २१,२००/- मुलीच्या जन्माच्या एका वर्षाच्या आत आयुर्विमा महामंडळाच्या योजनेत गुंतवून सदर मुलीस वयाची १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतर एकूण रुपये १,००,०००/- एवढी रक्कम प्रदान करण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

"माझी कन्या भाग्यश्री" या नवीन योजनेमध्ये सध्या सुरु असलेली "सुकन्या" ही योजना विलीन करुन व त्याबाबतचा शासन निर्णय अधिक्रमित करुन "माझी कन्या भाग्यश्री" ही योजना संपुर्ण राज्यात

सर्व गटातील दारिद्र्य रेषेखालील (BPL) कुटुंबात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी “सुकन्या” योजनेचे लाभ कायम ठेऊन त्या व्यतिरिक्त मुलीचा जन्म झाल्यापासून मुलगी १८ वर्षे वयाची होईपर्यंत खालीलप्रमाणे परिच्छेद २ मधील अधिकचे लाभ देण्यासाठी तसेच दारिद्र्य रेषेच्यावरील (APL) पांढरे रेशनकार्ड धारक कुटुंबात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी खालील परिच्छेद क्रमांक २ मधील टप्पा-१ मधील (II) मध्ये नमूद केलेले लाभ व टप्पा-६ मधील लाभ देण्यासाठी शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. **योजनेचे स्वरुप :-** “माझी कन्या भाग्यश्री” या योजनेमध्ये पुढीलप्रमाणे २ प्रकारचे लाभार्थ्यांना योजनेचे लाभ अनुज्ञेय राहतील.

| | |
|---|---|
| **प्रकार - १ चे लाभार्थी** | एकुलती एक मुलगी आहे व मातेने कुटुंबनियोजन केले आहे. |
| **प्रकार - २ चे लाभार्थी** | एक मुलगी आहे आणि मातेने दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली आहे. अशा परिस्थितीत दोन्ही मुलींना प्रकार-२ चे लाभ देय राहतील. मात्र एक मुलगा व एक मुलगी अशी परिस्थिती असल्यास लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत. |

“माझी कन्या भाग्यश्री” या योजनेअंतर्गत यापूर्वीच्या “सुकन्या” योजनेचे लाभ कायम ठेऊन खालीलप्रमाणे अधिक लाभ देण्यात येतील.

| महत्त्वाचा टप्पा | हेतू | अट | फायदे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकार - १ | प्रकार - २ | |
| (१) जन्माच्या वेळी | मुलीचा जन्म साजरा करण्याकरीता | जन्मनोंदणी आवश्यक | रु.५०००/- | पहिली मुलगी | दुसरी मुलगी |
| | | | | निरंक | रु.२,५००/- |
| | | | i) प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत मुलगी व तिची आई यांच्या नावाने संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. त्यामुळे रु.१.०० लाख अपघात विमा व रु.५,०००/- पर्यंत ओव्हर ड्राफ्टचा लाभ घेता येईल.<br>ii) मुलीच्या नावावर शासनामार्फत एल.आय.सी. कडे रु.२१,२००/- चा विमा उतरविण्यात येईल. तसेच मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर रु.१.०० लाख विम्याची रक्कम देण्यात येईल.<br>iii) आयुर्विमा महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्र शासनाच्या आम आदमी योजनेअंतर्गत सदर मुलीच्या नांवे जमा केलेल्या रक्कमेतून (Corpus Rs.२१,२००/-) नाममात्र रुपये १००/- प्रतिवर्षी इतका हप्ता जमा करुन मुलीच्या कमवित्या पालकांचा विमा उतरविला जाईल. ज्यात मुलीच्या पालकांचा | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अपघात/मृत्यू झाल्यास खालीलप्रमाणे लाभ अनुज्ञेय राहतील.<br>अ) नैसर्गिक मृत्यू-३०,०००/-<br>आ) अपघातामुळे मृत्यू-७५,०००/-<br>इ) दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी झाल्यास -७५,०००/-<br>ई) एक डोळा अथवा एक अवयव अपघातामुळे निकामी झाल्यास-३७,५००/-<br>उ) आम आदमी विमा योजनांतर्गत समाविष्ट शिक्षा सहयोग योजनेंतर्गत सदर मुलीला रुपये ६००/- इतकी शिष्यवृत्ती प्रती ६ महिने, इयत्ता नववी, दहावी, अकरावी आणि बारावी मध्ये मुलगी शिकत असतांना दिली जाईल. | |
| (२) मुलगी ५ वर्षे वयाची होईपर्यंत प्रत्येक वर्षाच्या शेवटी | दर्जेदार पोषण देण्यासाठी १ अंडे १ दिवस किंवा दर दिवशी दूध २०० मि.लि. दिले जात असल्याची खात्री करणे. | मुलगी जन्मल्यापासून अंगणवाडीतून लसीकरण प्रमाणपत्र आवश्यक | रु.२,००/- प्रतीवर्षीप्रमाणे एकूण रु.१०,०००/- ५ वर्षाकरीता | दोन्ही मुलींना प्रत्येकी रु.१,०००/- प्रतीवर्षीप्रमाणे एकूण रु.१०,०००/- ५ वर्षाकरीता |
| (३) प्राथमिक शाळा प्रवेश (इ.१ ली ते ५ वी) | गुणवत्तापुर्वक पोषण आहार व इतर संकीर्ण खर्चाकरिता | मुलीच्या शाळा प्रवेशाबाबत प्रमाणपत्र तसेच संबंधित शाळेकडून उपस्थिती प्रमाणपत्र आवश्यक | रु.२,५००/- प्रतीवर्षीप्रमाणे एकूण रु.१२,५००/- ५ वर्षाकरीता | दोन्ही मुलींना प्रत्येकी रु.१,५००/- प्रतीवर्षीप्रमाणे एकूण रु.१५,०००/- ५ वर्षाकरीता |
| (४) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रवेश (इ.६ वी ते १२ वी) | गुणवत्तापुर्वक पोषण आहार व इतर संकीर्ण खर्चाकरिता | मुलीच्या शाळा प्रवेशाबाबत प्रमाणपत्र तसेच संबंधित शाळेकडून उपस्थिती प्रमाणपत्र आवश्यक | रु.३,०००/- दरवर्षीप्रमाणे एकूण रु.२१,०००/- ७ वर्षाकरीता | दोन्ही मुलींना प्रत्येकी रु.२,०००/- प्रतीवर्षीप्रमाणे एकूण रु.२२,०००/- ७ वर्षाकरीता |
| (५) वयाच्या १८ व्या वर्षी | कौशल्य विकास, उच्च शिक्षण आणि रोजगार मिळविण्यासाठी | वयाची १८ वर्षे पुर्ण व अविवाहीत असलेबाबतचे पालकांचे शपथपत्र | विम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर रु.१.०० लाख देण्यात येतील. त्यापैकी किमान रु.१०,०००/- मुलीच्या कौशल्य विकासावर खर्च करणे आवश्यक राहील. | |
| (६) मुलीचा जन्म झाल्यानंतर | आजी आजोबाला प्रोत्साहनपर भेट | पहिल्या मुली नंतर मातेने कुटुंब नियोजन करणे आवश्यक | सोन्याचे नाणे (रु.५,०००/- कमाल मर्यादेपर्यंत व प्रमाणपत्र) | लागू नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| **(७)** गावाचा गौरव | मुलामुलींचे विषम असलेले लिंग गुणोत्तर १००० पेक्षा जास्त असण्यासाठी प्रोत्साहनपर | जिल्हाधिकारी यांचे लिंग गुणोत्तराबाबतचे प्रमाणपत्र तसेच सदरची रक्कम गावातील मुलींच्या विकासासाठी खर्च करणे आवश्यक राहील. | ग्रामपंचायतीस रु.५,००,०००/- इतके पारितोषिक मा. मंत्री, महिला व बाल विकास यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल. |

**३. वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेले अधिकचे लाभ दिल्यामुळे खालील उद्देश साध्य करण्यास मदत होईल. :-**

**(१) <u>जन्माच्या वेळी</u> :-** समाजामध्ये परंपरेनुसार कुटुंबामध्ये मुलाचा जन्म झाल्यानंतर मोठया प्रमाणावर आनंदोत्सव साजरा केला जातो तथापि मुलींचा जन्म झाल्यास तसा आनंदोत्सव साजरा केला जात नाही. या योजनेमध्ये देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीद्वारे भारतीय जनमानसाची मानसिक स्थिती बदलणे आणि त्यास मुलीच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा करण्यास प्रोत्साहन देणे हा उद्देश आहे. तसेच आर्थिक मदत मिळणार असल्यामुळे कुटुंबही मुलीचा जन्मोत्सव साजरा करण्यास प्रेरित होतील.

**<u>(२) मुलगी ५ वर्षे वयाची होईपर्यंत प्रत्येक वर्षाच्या शेवटी</u> :-** कुटुंबामध्ये मर्यादित उत्पन्नाचे आर्थिक स्त्रोत असल्यामुळे त्या स्त्रोताचा उपयोग मुलांच्या पालन पोषणासाठी केला जातो व मुलीकडे दुर्लक्ष केले जाते. अशाप्रकारे आर्थिक मदत दिल्यामुळे मुलींच्या पालन पोषणासाठी त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, तसेच त्या मुलीस करावयाचे लसीकरण व इतर खर्च करण्यासाठी कुटुंबास मदत होईल.

**<u>(३) इयत्ता १ ते ५ वी व (४) इयत्ता ६ वी ते १२ वी</u> :-** या आर्थिक मदतीचा उद्देश मुलींनी आपले शिक्षण पुर्ण करावे हा आहे. जेणेकरुन पुढची येणारी मातांची पिढी ही शिक्षित होईल असा उद्देश आहे. तसेच या माता शिक्षित असल्यामुळे त्यांना होणारी मुलेही आरोग्य संपन्न असतील व त्या माता मुलगा-मुलगी असा भेदभाव करणार नाहीत. त्यामुळे राज्यातील विषम लिंग गुणोत्तर सुधारण्यास तथा मुलींची संख्या वाढविण्यास मदत होईल. ही आर्थिक मदत मुलींना शिक्षण घेतांना लागणाऱ्या इतर बाबींसाठीही करण्यात येणार आहे. तसेच पोषण आहार, इत्यादी या बाबींसाठी इतर विभागाकडून आर्थिक मदत दिली जात नाही व लाभाची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत काळजी घेण्यात येईल. अंगणवाडी सेविका, मदतनीस हा निधी योग्यप्रकारे वापरण्यासाठी लाभार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करतील.

**<u>(५) वयाच्या १८ व्या वर्षी</u> :-** या आर्थिक मदतीचा उद्देश मुलींना आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण बनविणे हा आहे. या शिक्षित आणि आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण माता या आरोग्य संपन्न मुलास जन्म देतील आणि त्यांच्या मुलांना शिक्षित करतील.

**<u>(६) मुलीचा जन्म झाल्यानंतर आजी-आजोबांना सोन्याचे नाणे व प्रमाणपत्र देऊन सत्कार</u> :-** समाजातील बऱ्याचशा कुटुंबातील सासु सासरे यांच्याकडून मुलगाच पाहिजे असा दबाव टाकला जातो. त्यासाठी मुलीस जन्म देणाऱ्या मातेच्या सासु /सासरा यांस एक सोन्याचे नाणे (रु.५,०००/- मर्यादेपर्यंत) आणि प्रमाणपत्र देऊन मा. मंत्री, महिला व बाल विकास यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन, राजमाता जिजाऊ यांचा जन्मदिन, राष्ट्रीय बालिका दिन, महिला दिन अशा प्रसंगी सत्कार करण्यात येईल. जेणेकरुन सासू / सासरे मुलगा व्हावा अशी अपेक्षा न करता आपल्या सूनेस एकाच मुलीनंतर कुटुंबनियोजनास प्रोत्साहन देतील. अशा बाबींमुळे त्या कुटुंबाचा समाजात आदर वाढेल आणि बाकीचे कुटुंबही आपल्या कुटुंबात एक मुलगी असावी यासाठी प्रोत्साहित होतील.

**(७) गावाचा गौरव :-** सदर योजनेअंतर्गत समाजाला प्रोत्साहित करण्यासाठी ज्या गावामध्ये मुलामुलींचे लिंग गुणोत्तर १,००० पेक्षा जास्त असेल अशा गावास मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचेमार्फत रु.५ लाखाचे पारितोषिक दिले जाईल. ज्यामुळे समाजामध्ये आपल्या कुटुंबामध्ये मुलीचा जन्म व्हावा याबाबत प्रोत्साहन मिळेल. तसेच सदरची रक्कम ग्रामपंचायतीने संबंधीत गावातील मुलींच्या विकासासाठी खर्च करणे बंधनकारक राहील.

**४. या योजनेची उद्दिष्टे :-**

१) लिंग निवडीस प्रतिबंध करणे.
२) बालिकेचा जन्मदर वाढविणे.
३) मुलींच्या जीवनमानाच्या सुरक्षेबद्दल खात्री देणे.
४) बालिकेचा समान दर्जा व शैक्षणिक प्रोत्साहानाकरीता समाजात कायमस्वरुपी सामुदायिक चळवळ निर्माण करणे.
५) मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे.
६) सामाजिक बदलाचे प्रमुख घटक म्हणून पंचायत राज संस्था, शहरी स्थानिक समित्या व स्थानिक स्तरावरील कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे या कामामध्ये स्थानिक समुदाय महिला मंडळे, महिला बचत गट व युवक मंडळ यांचा सहभाग घेणे.
७) जिल्हा, तालुका व निम्नस्तरावर विविध संस्था व सेवा देणारे विभाग यांचा समन्वय घडवून आणणे.

**५. योजना राबविणारी यंत्रणा :-**

**(अ)** सदर योजना राबविण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरावर मार्गदर्शन व सनियंत्रण करण्यासाठी एक सुकाणु समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीची ४ महिन्यातून एकदा बैठक आयोजित करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) प्रधान सचिव, महिला व बाल विकास | - | अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | - | सदस्य |
| ३) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग | - | सदस्य |
| ४) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| ५) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | - | सदस्य |
| ६) युनायटेड नेशन पॉप्युलेशन फंड (UNFPA) | - | सदस्य |
| ७) उप सचिव, एबाविसेयो, महिला व बाल विकास विभाग | - | सदस्य सचिव |

**(ब)** सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे एक कार्यकारी समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची ३ महिन्यातून एकदा बैठक आयोजित करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई | - | अध्यक्ष |
| २) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे | - | सदस्य |
| ३) आयुक्त, कुटुंब कल्याण | - | सदस्य |
| ४) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | - | सदस्य |
| ५) आयुक्त, समाजकल्याण, पुणे | - | सदस्य |
| ६) संचालक (प्राथमिक शिक्षण, पुणे) | - | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७) सहआयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना | - | सदस्य |
| ८) उपआयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास, पुणे | - | सदस्य |
| ९) अतिरिक्त संचालक, SFWV | - | सदस्य |
| १०) PCPNDT (लिंग निवड प्रतिबंध चाचणी ) समन्वय अधिकारी, सा. आ. विभाग SFWB | - | सदस्य |
| ११) प्रतिनिधी UNFPA | - | सदस्य |
| १२) सर्व जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| १३) उपायुक्त, (अंगणवाडी) एकात्मिक बाल विकास सेवा योजना | - | सदस्य सचिव |

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत योजनेचे मुल्यमापन दरवर्षी करण्यात यावे. तसेच कार्यकारी समितीच्या बैठकांचे अभिलेखही जतन करण्यात यावेत.

**६. योजनेसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

"सुकन्या" योजनेचा समावेश नव्याने सुरु करण्यात आलेल्या "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेत करण्यात आल्यामुळे "सुकन्या" योजनेच्या सर्व अटी व शर्ती "माझी कन्या भाग्यश्री" योजनेमध्ये लागू करण्यात येत आहे. तसेच "सुकन्या" योजनेतील मुलींना "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

(१) सदर योजना सर्व गटातील दारिद्रय रेषेखालील (BPL) तसेच दारिद्रय रेषेच्यावरील (APL) (पांढरे रेशनकार्ड धारक) कुटुंबात जन्मणाऱ्या अपत्यांपैकी दोन मुलींना लागू असेल.

(२) सदर मुलीचे वडील महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.

(३) योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतांना बालिकेचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.

(४) विम्याचा लाभ घेताना मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण होणे आवश्यक राहील. तसेच तिने इयत्ता १० वी ची परिक्षा उत्तीर्ण होणे व १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत अविवाहित असणे आवश्यक राहील.

(५) दुसऱ्या प्रसुतीच्या वेळेस जर जुळ्या मुली झाल्या, तर त्या दोन्ही मुली प्रकार-२ प्रमाणे योजनेस पात्र असतील.

(६) एखाद्या परिवाराने अनाथ मुलीस दत्तक घेतले असेल तर सदर मुलीला त्यांची प्रथम मुलगी मानून या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. परंतु सदर लाभ प्राप्त होण्यासाठी दत्तक मुलीचे वय ० ते ६ वर्ष (६ किंवा ६ वर्षापेक्षा कमी) इतके असावे.

(७) बालगृहातील अनाथ मुलींसाठी ही योजना अनुज्ञेय राहील.

(८) प्रकार-१ च्या लाभार्थी कुटुंबास एका मुलीनंतर व प्रकार-२ च्या लाभार्थी कुटुंबास दोन अपत्यांच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे बंधनकारक राहील.

(९) सदर योजनेअंतर्गत १८ वर्षानंतर एल.आय.सी. कडून जे रु.१,००,०००/- मिळणार आहेत त्यापैकी किमान रु.१०,०००/- मुलींच्या कौशल्य विकासावर खर्च करणे बंधनकारक राहील जेणेकरुन संबंधित मुलीला रोजगार मिळून कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल.

(१०) सदर योजनेच्या टप्पा-२, टप्पा-३ व टप्पा-४ मध्ये नमूद केलेले लाभ लाभार्थीस पोषण आहार तथा वस्तु स्वरुपात देय राहतील.

(११) ज्या लाभधारकाचे खाते जनधन योजनेअंतर्गत असेल त्यांना जनधन योजनेअंतर्गत असणारे लाभ आपोआपच मिळू शकतील.

(१२) सदर योजना आधार सोबत जोडण्यात येईल.

(१३) विहित मुदतीपूर्वी (वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी) मुलीचा विवाह अथवा मृत्यू झाल्यास, या योजनेचा फायदा तिच्या पालकांना होणार नसून, मुलीच्या नांवे बँक खात्यात जमा असणारी रक्कम महाराष्ट्र शासनाचे नांवे असणाऱ्या Surplus अकाऊंट किंवा खात्यात जमा म्हणून दर्शविली जाईल.

(१४) भारतीय आयुर्विमा महामंडळ (LIC) महाराष्ट्र शासनाच्या नांवे एक नवीन पॉलिसी काढतील, ज्यामध्ये प्रत्येक लाभार्थी मुलींसाठी स्वतंत्र खाते असणार असून, Surplus खाते खालील परिस्थितीत कार्यरत करण्यात येईल.

अ) जर वैयक्तिक मुलीच्या नांवे असलेल्या एकत्रित निधी (Corpus) रु.१ लक्ष पेक्षा अधिक झाल्यास, जादाची रक्कम या खात्यात जमा होईल.

ब) मुदतीपूर्वी विवाह अथवा मृत्यू झाल्यास, मुलीच्या नावांवरील रक्कम एकत्रित निधी (Corpus) Surplus खात्यावर जमा होईल.

क) Corpus रु.१ लक्ष पेक्षा कमी असल्यास, उर्वरित रक्कम Surplus खात्यातून जमा केली जाईल.

(१५) सदर योजनेच्या स्वरुपामध्ये परिच्छेद २ मध्ये नमूद टप्प्यातील लाभ जर लाभार्थ्यास इतर विभागाच्या योजनेमधून मिळत असतील तर या योजनेचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

(१६) सदर योजनेअंतर्गत परिच्छेद क्रमांक २ मधील टप्पा-१ मधील जन्मदिन साजरा करण्यासाठी लाभार्थी कुटुंबास रोख स्वरुपात देण्यात येतील. तसेच उर्वरीत टप्प्यातील नमूद लाभ पोषण आहार तथा वस्तूच्या स्वरुपात देण्यात येतील.

**७. योजनेच्या अंमलबजावणी करीता यंत्रणा व अर्ज करण्याची कार्यपध्दती:-**

(अ) सदर योजनेअंतर्गत लाभाकरिता मुलीच्या पालकांनी मुलीचा जन्म झाल्यावर संबंधित ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिका या ठिकाणी मुलीच्या नांवाची नोंदणी केल्यानंतर त्या क्षेत्रातील अंगणवाडी सेविकेकडे **प्रपत्र-'अ' किंवा 'ब'** मध्ये अर्ज सादर करावा. अर्जासोबत वडील राज्याचे मूळ रहिवाशी असल्याचा पुरावा, (अधिवास प्रमाणपत्र) आणि जन्म नोंदणी प्रमाणपत्र, दारिद्रय रेषेखालील असल्याचा पुरावा (रेशन कार्ड / उत्पन्नाचा दाखला), लाभार्थ्यी कुटुंबाने प्रकार-१ चा लाभ घ्यावयाचा असल्यास पहिल्या अपत्याच्या (मुलगी) जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच दुसरे अपत्य असलेल्या मुलीसाठी अर्ज करतांना कुटुंब नियोजन शस्त्रकिया केली असल्याबाबतचे वैदयकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, ही कागदपत्रे सादर करावीत. सदर योजनेसाठी आवश्यक असलेले सर्व अर्ज राज्यातील प्रत्येक ग्रामीण व नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विभागीय उपायुक्त (महिला बाल विकास) यांचे कार्यालयात विनामूल्य उपलब्ध असतील. सदर अर्जाची छाननी अंगणवाडी सेविकेने करावी आणि सदर अर्ज अंगणवाडी सेविकेने पर्यवेक्षिका / मुख्यसेविकेकडे सादर करावा.

(ब) अंगणवाडी पर्यवेक्षिका / मुख्यसेविका सदर अर्जाची व प्रमाणत्रांची तपासणी करुन प्रत्येक महिन्याला नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना व ग्रामीण प्रकल्पा बाबत ग्रामीण बाल

विकास प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, यांना एकत्रित यादी मान्यतेसाठी सादर करण्यात यावी.

(क) संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) हे ऐच्छिकरित्या जास्त संख्या असलेल्या एखाद्या वस्तीची तपासणी करतील व त्यांची खात्री झाल्यानंतर लाभार्थी यादीला मान्यता देतील. तद्नंतर एक महिन्याच्या कालावधीत पडताळणी करुन बाल विकास प्रकल्प अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) रुपये २१,२००/- एवढी रक्कम एल.आय.सी. कडे जमा करतील व इतर अनुज्ञेय रक्कम चेकद्वारे संबंधित मुलीच्या आईच्या नावे अदा करतील.

(ड) मुलीचा जन्म झाल्यावर तिचे नांव नोंदविल्यावर त्या क्षेत्रातील अंगणवाडी सेविका / मुख्य सेविका / बाल विकास प्रकल्प अधिकारी महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करता येईल. उपरोक्त योजनेसाठी आवश्यक असलेले सर्व अर्ज राज्यातील प्रत्येक ग्रामीण व नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विभागीय उपायुक्त (महिला बाल विकास) यांचे कार्यालयात विनामूल्य उपलब्ध करून देण्यात यावेत. अर्जदारांनी संपूर्ण तपशीलासह भरून दिलेले अर्ज कागदपत्रासह वर नमूद केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांनी मुलीच्या जन्माच्या एका वर्षाच्या विहित मुदतीपर्यंत स्वीकारावेत. दत्तक मुलींच्या बाबतीत ६ वर्षांपर्यंतच्या विहित मुदतीपर्यंत स्वीकारावेत. अर्ज संपूर्ण भरलेला नसल्यास अथवा सर्व प्रमाणपत्रासह नसल्यास अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अर्जदारास कळवावे. अर्जदारांनी अपूर्ण भरलेले अर्ज किंवा आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसल्यास अशा अर्जदारांना वरील मुदती व्यतिरिक्त वाढीव एक महिन्याची मुदत देण्यात येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत कोणताही अर्ज २ महिन्यांपेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवता येणार नाही.

(इ) मुलीला एल.आय.सी. योजनेचे लाभ देण्याकरिता संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) यांच्या मान्यतेनंतर मुलीचे पालक जनधन योजनेअंतर्गत बँक बचत खाते उघडतील आणि त्याबाबतचा तपशिल संबंधित बाल विकास प्रकल्प कार्यालयास कळवतील. सदर अर्ज प्राप्त झाल्यावर ३० दिवसांच्या आत / अपवादात्मक परिस्थितीत ६० दिवसांच्या आत पडताळणी करुन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी / उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) हे संबंधित विभागातील आयुर्विमा महामंडळाच्या कार्यालयाशी (P&GS Unit) सोबत जोडलेल्या **प्रपत्र - 'क'** येथील विहित नमुन्यात माहिती भरून संपर्क साधतील.

८. **माहिती, शिक्षण व जनसंपर्क अभियान** :- या योजनेचे लाभार्थी सर्व स्तरातील (BPL / APL) लोक असतील. या अभियानाचा उद्देश मुलींचे समाजतील महत्व या विषयी कुटुंबाना समुपदेशन करणे आणि त्यांच्यामध्ये बालिका भृणहत्या, मुलींचा जन्म, शिक्षण, आरोग्य, इ. विषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे असा आहे. तसेच दारिद्रय रेषेवरील (APL) कुटुंबात एका मुलीच्या जन्मानंतर अंतिम कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली आहे अथवा एकुलती एक मुलगी आहे आणि मातेने दुसऱ्या अपत्यानंतर अंतिम कुटुंब नियोजनाची हमी दिल्यास तसेच सदर पालकांना मुलगी आहे तथापि दुसऱ्यांदा मुलगी जन्मल्यास

व अंतिम कुटुंबनियोजन केले आहे त्यांचा देखील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल.

**९. लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर विमा कंपनीशी लाभार्थ्यांनी संपर्क साधावयाची कार्यपध्दती:-**

सोबत जोडलेल्या **प्रपत्र "क"** नुसार नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी व ग्रामीण प्रकल्पा बाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद व महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विमा कंपनीकडे "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची माहिती सादर करतील. प्रपत्र ड-१ नुसार आम आदमी विमा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी विमा प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात यावा. प्रपत्र ड-२ नुसार आम आदमी विमा योजनेंतर्गत असलेल्या शिक्षा सहयोग योजनेंतर्गत शिष्यवृत्तीसाठी विहित नमुन्यात नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी व ग्रामीण प्रकल्पाबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद व महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करण्यात यावा. प्रपत्र ड-३ नुसार संबंधित अधिकाऱ्यामार्फत आम आदमी विमा योजनेंतर्गत असलेल्या शिक्षा सहयोग योजनेनुसार शिष्यवृत्तीसाठी पात्र विदयार्थ्यांची यादी विमा प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल. प्रपत्र ड-४ नुसार आम आदमी विमा योजनेंतर्गत भारतीय आयुर्विमा महामंडळाला उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित अधिकाऱ्यामार्फत देण्यात येईल. या योजनेसाठी प्राधिकृत अधिकारी / नोडल एजन्सी नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी व ग्रामीण बाल विकास प्रकल्प अधिकारी / उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), व महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे राहतील.

- अर्जदाराचा अर्ज परिपूर्ण असल्यास नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी व ग्रामीण प्रकल्पाबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद व महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे एक महिन्याच्या आत विमा कंपनीकडे **प्रपत्र-"क"** मधील विहित नमुन्यानुसार जवळच्या आयुर्विमा कार्यालयाशी (P&GS Unit) संपर्क साधतील.
- नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी व ग्रामीण प्रकल्पाबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद व महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी आपापल्या क्षेत्रातील / संस्थेतील कोणतीही बालिका या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- सदर योजनेसाठी कोणत्याही मध्यस्थ अथवा अन्य अशासकीय व्यक्तींचा सहभाग असणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
- या योजनेंतर्गत प्रत्येक महिन्यात प्राप्त झालेले अर्ज यापैकी अपूर्ण व निकाली काढलेल्या अर्जाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी व ग्रामीण प्रकल्पाबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद व महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांनी संबंधित विभागीय उपायुक्त, महिला बाल विकास यांचेकडे सादर करणे आवश्यक राहिल.

- एल.आय.सी. योजनेचा अर्ज जरी बालिकेच्या जन्माच्या वेळेस देण्यात आला असला तरी या योजनेचा प्रत्यक्ष लाभ बालिका १८ वर्षांची झाल्यावरच मिळणार असल्याने या योजनेसाठीचा अर्ज स्वीकारल्यानंतर त्या बालिकेचे योग्यवेळी ओळखपत्र, आधार कार्ड, बँक खाते इ. अधिकृत दस्तावेज काढण्यास त्या त्या प्रकल्पाच्या मुख्य सेविकेने लाभार्थी बालिकेस व तिच्या पालकांस मदत करावी, म्हणजे बालिकेचे १८ वर्ष पूर्ण झाल्यावर तिला या योजनेचा लाभ तात्काळ मिळविणे सोईचे होईल.
- सदर योजनेची अंमलबजावणी योग्यरीतीने होण्याबाबत खातरजमा करण्याची जबाबदारी महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.
- भारतीय आयुर्विमा महामंडळ व महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्यावतीने आयुक्त, महिला व बालविकास, पुणे तसेच आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्यामध्ये नव्याने सामंजस्य करार करण्यात येईल.
- आयुक्त, महिला व बालविकास, पुणे व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई आणि विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांनी जिल्हा प्रसिध्दी अधिकारी यांच्या मदतीने या योजनेस पुरेशी प्रसिध्दी दयावी.
- या योजनेखालील तरतुदी संदर्भात अडचण अथवा संभ्रम निर्माण झाल्यास त्याबाबत आयुक्त, महिला बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे / आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेमार्फत शासनाकडे संदर्भ करावा. कोणत्याही वादग्रस्त मुद्दयांबाबत शासनाने दिलेला निर्णय अंतिम राहिल.
- या योजनेखाली पात्र ठरणाऱ्या मुलींचा सत्कार करण्यात यावा. त्यासाठी जिल्हास्तरावर मोठया प्रमाणावर प्रसिध्दी दयावी. त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे व आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई आणि विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्यामार्फत करण्यात यावी.

**१०.** उपरोक्त योजनेंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील सर्व मुलींच्या पालकांना कुटुंब नियोजन शस्त्र क्रीयेनंतर रोख रू.२०००/- सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत मिळतील, तर सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेंतर्गत रू.८०००/- चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत देण्याऐवजी उपरोक्त महिला व बाल विकास विभागाच्या "माझी कन्या भाग्यश्री" योजनाचा लाभ दारिद्रय रेषेखालील प्रत्येक मुलीला देण्यात यावा. याबाबतीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येईल.

**११.** सदर योजना दिनांक ०१ एप्रिल, २०१६ पासून लागू राहील. तथापि यापूर्वी "सुकन्या" योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थींना सुकन्या योजनेचे लाभ कायम ठेऊन पुढील कालावधीसाठी "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेचे अनुज्ञेय लाभ देय राहतील.

**१२.** सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या मान्यतेने त्यांचे अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे नियोजन विभागाचे अनौसं क्रमांक ३/का-१४७२, दिनांक ०५/०१/२०१६ व अनौसं क्रमांक ५/१४११, दिनांक १५/०१/२०१६ आणि वित्त विभागाचे अनौसं. क्रमांक ६६/व्यय-६ दिनांक ३०.०१.२०१६ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२२६१७२०४२६८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasave Vijesing F

Digitally signed by Vasave Vijesing F
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasave Vijesing F
Date: 2016.02.29 17:57:55 +05'30'

**(वि. फ. वसावे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) मा. सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
१९) सचिव, बाल हक्क संरक्षण आयोग
२०) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग
२१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
२२) सर्व विभागीय आयुक्त
२३) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
२४) सर्व जिल्हाधिकारी
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२६) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
२७) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

२८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२९) वित्त विभाग/व्यय-६, मंत्रालय, मुंबई
३०) नियोजन विभाग/का.१४७२, मंत्रालय, मुंबई
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३३) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद
३४) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
३५) सर्व अधिक्षक / अधिक्षिका, शासकीय संस्था, महिला व बाल विकास विभाग
३६) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
३७) निवड नस्ती (कार्यासन ६)